# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/परिपत्रकीय समिती/अध्यासी अधिकारी/ १६७६ /२०२० दिनांक : १५/०६/२०२०

## -: परिपत्रक :-

**वाचावे**:- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४

३. प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र.रासनिप्रा/पदा.नि./अध्यासी अधि/आदेश/४१८०/२०१६ दि.११/०७/२०१६

४. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब अधिसुचना दिनांक ०६.०८.२०१८ रोजी प्रसिध्द झालेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१८

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम २(९) मधील तरतुदीनुसार पदाधिकारी निवडीचाही समावेश निवडणुकी मध्ये होतो. आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ कब मधील तरतुदीप्रमाणे सहकारी संस्थांच्या संचालक समिती निवडणुकीचे व पदाधिकारी निवडीचे अधिकार राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास आहेत. तसेच

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब मधील तरतुदीनुसार राज्यातील सहकारी संस्थाच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली असुन उक्त कलमाच्या उपकलम (१२) नुसार सहकारी संस्थांच्या समितीच्या पदाधिकारी यांची निवडणुक राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने घ्यावयाची आहे. आणि,

ज्या अर्थी, पदाधिकाऱ्यांच्या निवडीबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ७७ मध्ये तरतुद असुन पदाधिकारी निवडीसाठी बोलावावयाच्या सभेचे अध्यक्ष हे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांनी प्राधिकृत केलेले अधिकारीच असतील अशी तरतुद आहे.

ज्या अर्थी,संस्थेच्या पदाधिका-याने (चेअरमन/व्हा.चेअरमन) राजीनामा दिल्यास अथवा त्यांचा मृत्यु झालयास अथवा त्यांना निबंधकाने अपात्र केल्यास अथवा त्यांचे विरुध्द अविश्वास ठराव मंजुर झाल्यास तसेच संचालक मंडळाची निवडणूक पार पडल्यानंतर पदाधिकारी यांची निवड करणे आवश्यक असते.अशा पदाधिकारी निवडीकरिता अध्यासी अधिकारी नेमणूकीचे अधिकार प्राधिकरणास आहेत.त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये दर्शविलेल्या 'अ ' 'ब' 'क' व 'ड'या चार प्रकारांपैकी 'ब' 'क' व 'ड'या वर्गवारी मधील संस्था करिता संबंधीत जिल्हा/तालुका/प्रभाग/ सहकारी निवडणूक अधिका-याने रकाना क्र.३मध्ये नमूद केलेल्या अधिकारी/कर्मचारी/व्यक्ती यांची अध्यासी अधिकारी म्हणून त्यांचेस्तरावर नियुक्ती करावी त्यामुळे 'ब' 'क' व 'ड'या वर्गवारी मधील सहकारी संस्थाच्या पदाधिकारी निवडीचे प्रस्ताव प्राधिकरणास पाठविण्याची आवश्यकता नाही.

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (v) अन्वये 'ब' 'क' व 'ड'या प्रकारातील सहकारी संस्थाच्या प्राधिकृत अधिकारी नेमणुकीबाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ प्रभावाने लागु राहील.

## - : आदेश : -

| अ.क्र. | 'ब' वर्ग सहकारी संस्था | अध्यासी अधिकाऱ्यांची श्रेणी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | नागरी सहकारी बँक | राज्य शासनाचे वर्ग – १ व २ अधिकारी |
| २ | पगारदार सहकारी बँक (विभागस्तर व राज्यस्तर) | राज्य शासनाचे वर्ग – १ व २ अधिकारी |
| | पगारदार सहकारी बँक (जिल्हा क्षेत्र) | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी |
| ३ | सर्व प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था आणि आदिवासी कृषी सहकारी पतसंस्था | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग – २ अधिकारी, वर्ग- ३ दर्जा<br>वर्ग – ३ मध्ये सहकारी अधिकारी श्रेणी – १, २ व सहाय्यक सहकार अधिकारी व तत्सम वेतनश्रेणीतील शासनाच्या इतर विभागातील अधिकारी . |
| ४ | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एक जिल्हा व त्यापेक्षा जास्त आहे. | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |
| | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापेक्षा कमी आहे. | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील सर्व कर्मचारी (कनिष्ठ लिपीक वगळून) |
| ५ | कर्मचारी पतसंस्था (१ कोटी पेक्षा जास्त वसुल भाग भांडवल) | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |
| | कर्मचारी पतसंस्था (१ कोटी पेक्षा कमी वसुल भाग भांडवल) | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी आणि वर्ग – ३ मधील कर्मचारी (कनिष्ठ लिपिक वगळुन) |
| ६ | शासन अर्थ सहाय्यीत प्रकीय संस्था | राज्य शासनाचे वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| ७ | शासन अर्थ सहाय्यीत औद्योगिक संस्था किंवा औद्योगिक वसाहत | राज्य शासनाचे वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| ८ | जिल्हा / तालुका खरेदी विक्री संघ | राज्य शासनाचे वर्ग – १ आणि वर्ग - २ अधिकारी |
| ९ | जिल्हा मध्यवर्ती ग्राहक संस्था | राज्य शासनाचे वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| १० | सर्व सहकारी रुग्णालये आणि सहकारी शैक्षणिक संस्था | राज्य शासनाचे वर्ग – १ व वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ व २ कर्मचारी |
| ११ | दुध संघ (१ लाख लिटर पेक्षा कमी प्रति दिनसरासरी दुध संकलन) | राज्य शासनाचे वर्ग – १ व वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |
| १२ | इतर तालुका/जिल्हा स्तरीय संघीय संस्था ज्या अ वर्गात समाविष्ट नाही. | राज्य शासनाचे वर्ग – १ व वर्ग – २ अधिकारी व वर्ग – ३ मधील श्रेणी – १ कर्मचारी |
| **अ.क्र.** | **'क' वर्ग सहकारी संस्था** | **अध्यासी अधिकाऱ्यांची श्रेणी** |
| १ | २ | ३ |
| १ | सर्व सहकारी पतसंस्था ज्यांचे कार्यक्षेत्र एका जिल्हयापुरते आहे. | प्राधिकरणाने मंजुर केलेल्या पॅनल मधील निवडणुक निर्णय अधिकारी<br>उदा. वकील, प्रमाणित लेखापरिक्षक, लिपिक, सहाय्यक सहकार अधिकारी, सेवा निवृत्त कर्मचारी, लेखापरिक्षक वर्ग – ३ इ.<br>अ.क्र.५ करीता कनिष्ठ लिपीकही अनुज्ञेय असेल. |
| २ | कर्मचारी पतसंस्था (१ कोटी पेक्षा कमी वसूल भाग भांडवल) | |
| ३ | सहकारी गृहनिर्माण संस्था (२०० किंवा २०० पेक्षा जास्त सभासद) | |
| ४ | प्राथमिक ग्राहक भांडारे | |
| ५ | सर्व प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था, ज्यांचे दैनिक सरासरी दुग्ध संकलन लगतच्या आर्थिक वर्षात १०० लिटर किंवा १०० लिटरपेक्षा जास्त आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| ६ | सर्व विभागीय आणि जिल्हा सहकारी मंडळे | |
| ७ | सर्व प्राथमिक सहकारी पणन संस्था | |
| ८ | इतर कृषी सहकारी संस्था | |
| ९ | लगतच्या वर्षी २०० पेक्षा जास्त सभासद असलेल्या उपसा जलसिंचन आणि सहकारी पाणी वापर संस्था | |
| **अ.क्र.** | **'ड' वर्ग सहकारी संस्था** | **अध्यासी अधिकाऱ्यांची श्रेणी** |
| **१** | **२** | **३** |
| १ | पाणीवापर/उपसा/जलसिंचन सहकारी संस्था(२०० पेक्षा कमी सभासद | |
| २ | मजुर/वन सहकारी संस्था | |
| ३ | सर्व अनुदान अप्राप्त औद्योगिक संस्था | |
| ४ | सर्व अनुदान अप्राप्त सहकारी प्रक्रिया संस्था., साखर कारखाने वगळून | प्राधिकरणाने मंजुर केलेल्या पॅनल मधील निवडणुक निर्णय अधिकारी<br>उदा. वकील, प्रमाणित लेखापरिक्षक, लिपिक, सहाय्यक सहकार अधिकारी, कनिष्ठ लिपीक सेवा निवृत्त कर्मचारी, लेखापरिक्षक वर्ग – ३ इ |
| ५ | सर्व प्रकारच्या प्राथमिक विणकर (हातमाग आणि यंत्रमाग) सहकारी संस्था | |
| ६ | सर्व प्राथमिक दुग्ध संस्था ज्यांचे मागील वर्षात दैनिक सरासरी दुध संकलन १०० लिटरपेक्षा कमी आहे. | |
| ७ | सर्व प्राथमिक कुक्कुट, मत्स्य, वराह आणि पशुधन सहकारी संस्था | |
| ८ | स्वयं व्यवसाय सहकारी संस्था, बेरोजगार तरुणांच्या सहकारी संस्था आणि ज्या संस्थांची नोंद सर्वसामान्य संस्था हया वर्गीकरणात झालेली आहे. | |

सदर आदेश महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ७७ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त अधिकारानुसार उपरोक्त नमुद संस्था प्रकारनिहाय रिक्त होणारी पदाधिकारी पदावर निवड करावयाचे सभेचे अध्यासी अधिकारी म्हणून रकाना क्रमांक ३ मधील नमुद अधिका-यास प्राधिकृत करणेकरिता निर्गमीत करण्यात येत आहेत.

मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति :-

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

त्यांना कळविण्यात येते की,आपल्या अधिनस्त संस्थाच्याबाबतीत अध्यासी अधिकारी नियुक्त् करतांना संस्थांच्या प्रकारनिहाय उपरोक्त आदेशाप्रमाणे अध्यासी अधिका-याची नियुक्ती करावी.

सदर नियुक्ती करताना प्रस्ताव प्राप्त झाल्यावर पदाधिकारी पद रिक्त झाल्याची खात्रीअंती अध्यासी अधिकारी नेमणुकीचे आदेश पारीत करावेत व निर्गमित केलेल्या आदेशाची प्रत आणि प्राधिकृत अधिका-याचा निवडणूक पुर्ण झाल्याबाबतचा अहवाल प्राधिकरणास तात्काळ सादर करावा.